क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन/रक्कम परत/११९/२०२१ मुंबई, दि.१८/०८/२०२२

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांच्या घरबांधणी अग्रिमाबाबत.

*****

**परिपत्रक**

राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यासाठी बँका/ वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत रक्कम वितरीत करण्यास शासनाने दि.१०/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी दिली होती. त्याअनुषंगाने माहे मे २०१९ पर्यंत एकूण रु.८६८.५० कोटी इतके घरबांधणी अग्रिम वितरीत करण्यात आले आहे.

**सदर प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की,**

१. पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी त्यांना बँके मार्फत मंजूर केलेले घर बांधणी अग्रीम व्याजासह एकरक्कमी परत केल्यानंतर काही घटक कार्यालयाकडून सदरची रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयाच्या अॅक्सेस बँकच्या खात्यावर न जमा करता मुख्य लेखाशिर्ष ७६१० या शासनाच्या खात्यावर जमा करण्यात येत आहे, व त्यानंतर या कार्यालयाकडून सदर प्रकरणी मार्गदर्शन मागविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना बँकामार्फत/ ऑनलाईन पध्दतीने घरबांधणी अग्रिम वितरीत केले आहे, त्यांचे घरबांधणी अग्रिम व्याजासह परत करुन घेताना सदरची रक्कम या कार्यालयाच्या अॅक्सेस बँक खात्यावर (DG of police House Building Advance या नावाच्या अॅक्सेस बँकेतील खाते क्र.९१७०२००८०५२५०२७, IFSC Code:- UTIB०००००१२४) पाठविण्यात यावी.

२. तसेच मुख्य लेखाशिर्ष ७६१० अंतर्गत मंजूर झालेले घरबांधणी अग्रिम परत करताना किंवा त्यावरील व्याजाची रक्कम परत करताना पोलीस महासंचालक कार्यालयाच्या अॅक्सेस बँकेच्या खात्यावर जमा करण्यात येते. व त्यानंतर संबंधीत कार्यालयाकडून सदरची रक्कम परत मिळावी याकरीता पत्रव्यावहार केला जातो.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना मुख्य लेखाशिर्ष ७६१० अंतर्गत घरबांधणी अग्रिम वितरीत केले आहे, त्यांचे घरबांधणी अग्रिम व्याजासह परत करुन घेताना सदरची रक्कम शासनाच्या खात्यावरच जमा करण्यात येत असल्याची खात्री करावी.

तसेच सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, **त्यांच्या कार्यालयातील ज्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी बँके मार्फत / ऑनलाईन पध्दतीने घेतलेल्या घर बांधणी अग्रीमाची रक्कम व्याजासह परत केली आहे किंवा काही पोलीस अधिकारी/ अंमलदार यांच्या निधनामुळे अग्रिम रक्कम परत करण्यात आली आहे, परंतु त्यांचे नाव अद्याप घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअर मध्ये दिसत आहे. त्यांची माहिती व्याजपरीगणनेच्या तक्त्यासह खालील रकान्यामध्ये भरुन या कार्यालयास पाठवावी. जेणे करुन संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे नाव सॉफ्टवेअर मधून कमी करणे शक्य होईल.**

| अ.क्र. | अग्रिमधारकाचे नाव/ पदनाम/ कार्यालयाचे नाव | सेवार्थ आयडी | घरबांधणी अग्रिमाची मंजूर रक्कम | मंजूर महिना- वर्ष | रक्कम परत करण्याचे कारण | वसुल रक्कम (मुद्दल + व्याज) | रक्कम या कार्यालयास पाठविलेला दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|

( एस. जयकुमार)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.राज्य मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त,(रेल्वेसह) (बृहन्मुंबई वगळून)



Scanned by Scanner Go

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/वाहतूक, मुंबई/ लोहमार्ग, मुंबई/रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे

संचालक, न्याय सहायक वैद्यकीय प्रयोगशाळा, नाशिक/ पुणे/ कोल्हापूर/ नांदेड/ औरंगाबाद/ नागपूर/ अमरावती

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ नागरी हक्क संरक्षण, मुंबई /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल नागपूर/पुणे

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)

पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे/पूर्व विभाग, नागपूर/विशेष कृती दल नागपूर/नागरी दहशतवाद विरोधी प्रशिक्षण केंद्र, गोरेगांव, मुंबई/ अंगुली मुद्रांक, मुंबई

उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे /अ.अ.प्र.के., नागपूर

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६/राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर/ धुळे अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे / कोल्हापूर / औरंगाबाद / नांदेड / नागपूर / नाशिक / अमरावती/ ठाणे

पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे / अमरावती / नागपूर / औरंगाबाद/कोंकण भवन, नवी मुंबई/नाशिक / कोल्हापूर



Scanned by Scanner Go